पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९००/२०१३
दिनांक : २७ / ०९ / २०१३

प्रति,

मा.......................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची सभा दिनांक **०४/१०/२०१३** रोजी आयोजित केलेबाबत**.**

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०४/१०/२०१३** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव करिता**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.
मा.विधी समिती सभा
**कार्यपत्रिका क्रमांक ९**

दिनांक : **०४/१०/२०१३** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०४/१०/२०१३** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**विषय क्र.१)** अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार निगडी से.क्र.२२ येथील गुरुदत्त उद्यानाचे नुतनीकरण करणे या कामातून अ प्रभागातील इतर उद्यानांची देखभाल दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक ०४/१०/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.२)** मनपाचे बीआरटीएस विभागाकडील विषयपत्रानुसार जुन्या मुंबई पुणे रस्त्यावरील भक्ती-शक्ती चौक येथे बस टर्मिनल विकसित करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३ च्या दरसूचीनुसार पत्रक तयार केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.२,९०,४४,७१०/-( अक्षरी र.रु.दोन कोटी नव्वद लाख चौव्वेचाळीस हजार सातशे दहा फक्त्) इतकी आहे. सदर काम पूर्ण करणेस एकूण १२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सदरचे कामास सन २०१३-१४ मध्ये एकूण २,९०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे. (पानांक ४८ अ.क्र.१४/१३७) सदर बस टर्मिनलचे क्षेत्रफळ २१०० चौ.मी. असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. १) बांधकामाचा प्रकार-वीट बांधकाम २) छताचा प्रकार- GI Sheet ३) Flooring - Anti Skid flooring ४) भिंतीस Aluminum Cladding ५) Control Room ६) Ticket Counter ७) Separate Plat form for BRT & Private buses ८) Rest Room for bus Driver ९) Waiting area for passengers १०) Parking for private vehicles ११) Toilet block याकामी येणा-या र.रु.२,९०,४४,७१०/- (अक्षरी र.रु.दोन कोटी नव्वद लाख चौव्वेचाळीस हजार सातशे दहा फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक ०४/१०/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.३)** मनपाचे बीआरटीएस विभागाकडील विषयपत्रानुसार औंध रावेत रस्त्यावरील मुकाई चौक येथे बस टर्मिनल विकसित करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३ च्या दरसूचीनुसार

अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१,३०,३५,०००/- इतकी आहे. सदर काम पूर्ण करणेस एकूण १२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सदरचे कामास सन २०१३-१४ मध्ये एकूण २,९०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे.(पानांक ४८ अ.क्र.१४/१३७) सदर बस टर्मिनलचे क्षेत्रफळ ९२० चौ.मी. असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. १) बांधकामाचा प्रकार-वीट बांधकाम २) छताचा प्रकार- GI Sheet ३) Flooring - Anti Skid flooring ४) भिंतीस Aluminum Cladding ५) Control Room ६) Ticket Counter ७) Separate Platform for BRT & Private buses ८) Rest Room for bus Driver ९) Waiting area for passengers १०) Parking for private vehicles ११) Toilet block याकामी येणा-या र.रु.१,३०,३५,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी तीस लाख पस्तीस हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०४/१०/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.४)** पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण मा.महापौर, सन्माननीय पदाधिकारी, शहरातील विविध कला क्षेत्रातील कलावंत आणि सांस्कृतिक संस्था यांच्या कडून प्राप्त झालेल्या सुचना / अभिप्राय विचारात घेऊन तयार करण्यात आले आहे. प्रस्तावा सोबतचे परिशिष्ट अ, ब, क, ड, इ, प, व फ प्रपत्रामध्ये नमुद सांस्कृतिक आणि कला धोरणास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०४/१०/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.५)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २०१३ प्रस्तावा सोबत नमुद केलेप्रमाणे (प्रारुप) तयार करणेत आलेली आहे. त्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.६)** जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर खाली नमुद केलेप्रमाणे -

| अ.क्र. | नांव | पदोन्नतीचे पदनाम | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | डॉ.पाटणेकर राजीव विष्णूपंत | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |
| २ | डॉ.पोटे संजय लक्ष्मण | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला(इ.मा.व) |
| ३ | डॉ.जॉन सुनिल | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |

अधिका-यांना पे बँड र.रु. १५६०० - ३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये जेष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता मिळण्यासाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.७)** मनपाचे सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील पान क्र.७७१ अ.क्र.२१ मधील मोशी कचरा डेपो येथे जुन्या कच-यावर व एस.एल.एफ.क्लोजर करता यापुर्वी केलेल्या कॅपिंगवर सोलर फार्मिंग करुन विद्युत निर्मिती करणे या कामाचे ( अंदाजपत्रकीय र.रु.१०.०० कोटी व तरतुद र.रु.५.०० लाख) ऐवजी मोशी कचरा डेपो येथे सॅनिटरी लॅन्डफिल साईट टप्पा २ विकसित करणेचे काम करणेस मान्यता असलेस अंदाजपत्रकीय किंमत र.रु.१२.५० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.८)** श्री.खांडकेकर प्रशांत शरद, मुख्याधिकारी (गट-अ) यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.९)** रावेत येथील अशुध्द जलउपसा केंद्राच्या परिसरात विद्युत विभागाकरिता स्विचींग स्टेशन बांधणेकामी येणा-या र.रु.५८,८०,७८६/- ( अक्षरी र.रु.अठ्ठावन्न लाख ऐंशी हजार सातशे शहाऐंशी फक्त ) चे पुर्वनणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१०)** प्रभाग क्र.२९ इंद्रायणीनगर मधील पवना संस्था ते उष:किरण हॉटेल ते संकेत हॉटेल रस्त्यावर दिवे बसविणेकामी येणा-या र.रु.१५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव करिता**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९०० /२०१३
दिनांक : २७/०९/२०१३

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.